महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद-४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
इमेल : roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.विकाऔ/शिक्षण/२०२१/ 516 दिनांक 17 FEB 2021

प्रति,
संचालक /प्राचार्य,
सर्व शासकीय,शासन अनुदानीत,
विनाअनुदानीत तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर
अभ्यासक्रमांच्या संस्था,
औरंगाबाद विभाग.

विषय : **महाराष्ट्रातील लाखो विदयार्थ्यांसाठी "IASआपल्या भेटीला आणि उदयोजक आपल्या भेटीला " हा उपक्रम राबविणे बाबत....**

संदर्भ : १ **मा.संचालक,तंत्रशिक्षणसंचालनालय,महाराष्ट्रराज्य,मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/स्पर्धा परीक्षा मार्गदर्शष्/२०२०/३५५,दिनांक ११.१२.२०२०**

२ **मा.संचालक,तंत्रशिक्षणसंचालनालय,महाराष्ट्रराज्य,मुंबई यांचे पत्र क्र.१९/तंशिसं/क्चॉसे/२०२१/१२ दिनांक १२.०२.२०२१**

३ **या कार्यालयाचे पत्र क्र.विकाऔ/शिक्षण/२०२१/३१ दिनांक ०५/०१/२०२१**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण विभागातून राज्यातील दरवर्षी लाखोच्या संख्येने पदवीधर होऊन बाहेर पडणा-या युवकांना कौशल्याभिमुख व उदयोजकीय ज्ञानाने परिपूर्ण असे ज्ञान देणे आवश्यक आहे. COVID-१९ मुळे भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये पर्यायाने महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेमध्ये एक मोठा सकारात्मक बदल झाला तो म्हणजे विदयार्थी,शिक्षक,शिक्षण व्यवस्था आणि प्रशासन हे तंत्रज्ञानाचा वापर मोठया प्रमाणामध्ये करुन ऑनलाईन शिक्षण-प्रशिक्षणाचा मार्ग अवलंबत आहेत, आता याच धर्तीवर महाराष्ट्रातील उच्च व तंत्र शिक्षण विभागामध्ये शिकणा-या लाखो विदयार्थ्यांसाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्रामार्फत १. "IAS आपल्या भेटीला व २.उदयोजक आपल्या भेटीला हे अभिनव उपक्रम राबविण्या बाबत संदर्भ क्र.२ अन्वये सुचीत करण्यात आलेले आहे. संदर्भ क्र.3 अन्वये आपल्या संस्थेत स्थापन करण्यात आलेल्या स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्राच्या समन्वयाकडून उपरोक्त उपक्रम राबविण्यात येऊन, संदर्भ् क्र. २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे "IAS आपल्या भेटीला आणि उदयोजक आपल्या भेटीला " या उपक्रमासाठी नियुक्त करावयाच्या समन्वयकांचे नांव व इतर माहीती careerkatta365@gmail.com, desk19@dtemaharashtra.gov.in व या कार्यालयाच्या ई-मेल आयडीवर दिनांक १८.०२.२०२१ रोजी ५.०० पर्यत सादर करावी.

सोबत : संदर्भीय पत्राची प्रत.

(महेश शिवणकर)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर अपलोड करण्याकरीता.

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९४१९

ई-मेल–desk19@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: १९/तंशिसं/क्वॉसे/२०२१/१२ दिनांक : 12 FEB 2021

प्रति,

**सहसंचालक**

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/ पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

**विषय : महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांसाठी "IAS आपल्या भेटीला आणि उद्योजक आपल्या भेटीला" हा उपक्रम राबविणेबाबत...**

**संदर्भ** : १) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र क्र. मंत्री/उवतंशि/व्हीआयपी/ १०८/२०२१, दि. ०८-०२-२०२१

२) तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. २अ/एडीएम/स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन/ २०२०/३५५, दिनांक ११ डिसेंबर, २०२०

तंत्र शिक्षण विभागातून राज्यातील दरवर्षी लाखोच्या संख्येने पदवीधर होऊन बाहेर पडणाऱ्या **युवकांना कौशल्याभिमुख व उद्योजकीय ज्ञानाने परिपूर्ण असे ज्ञान देणे आवश्यक आहे.** COVID- १९ ही जगावर आलेली एक आपत्ती जरी असली तरी भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये पर्यायाने महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेमध्ये एक मोठा सकारात्मक बदल झाला तो म्हणजे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षण व्यवस्था आणि प्रशासन हे तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणामध्ये करत ऑनलाइन शिक्षण-प्रशिक्षणाचा मार्ग अवलंबत आहेत, आता याच धर्तीवर महाराष्ट्रातील उच्च व तंत्र शिक्षण विभागामध्ये शिकणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्रामार्फत खालील दोन अभिनव उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

**१. IAS आपल्या भेटीला**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग आणि भारतीय प्रशासकीय सेवेच्या वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुणे, दिल्ली याठिकाणी वेगवेगळ्या सुविधा व मान्यवरांचे मार्गदर्शन उपलब्ध असल्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये ग्रामीण भागातून युवक शहरी भागामध्ये येतो. तो थांबवणे त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेसाठी करावा लागणारा खर्च सर्वसामान्यांच्या आवाक्यात यावा, यासाठी IAS आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत दिल्ली, मुंबई अथवा संपूर्ण भारतामध्ये कार्यरत असणारे प्रशासकीय अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन दररोज एक याप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देता येईल. प्रत्यक्ष कार्यरत असणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचे वेगवेगळे अनुभव लोकांना प्रेरणा व प्रोत्साहन तर देतीलच पण त्याचबरोबर युवकांचा प्रशासकीय सेवेमध्ये येण्याचा दृष्टिकोन बदलण्यामध्ये देखील मदत होईल.

**२. उद्योजक आपल्या भेटीला**

उद्योजकीय कौशल्य वाढीसाठी - उद्योजक आपल्या भेटीला हा उपक्रम महाविद्यालयीन युवक ज्यांना स्वतःचा उद्योग व्यवसाय सुरू करावयाचा आहे, त्यांचे उद्योजकीय कौशल्य वाढीस लागण्यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर चालू असणाऱ्या वेगवेगळ्या संकल्पनांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, या दृष्टिकोनातून

"उद्योजक आपल्या भेटीला" हा उपक्रम राज्यभरामध्ये राबविण्यात येत आहे. महाविद्यालयातून दरवर्षी बाहेर पडणाऱ्या लाखो पदवीधरांमधून अनेक आयएएस, आयपीएस आणि उद्योजक घडवण्यासाठी हा उपक्रम निश्चितपणे मार्गदर्शक ठरेल आणि देशाच्या विकासासाठी हातभार लागेल.

याबाबत आपणांस कळविण्यांत येते की, सदरचे उपक्रम राबविण्याकरीता आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांना कळविण्यांत यावे. तसेच संचालनालयाच्या संदर्भाधिन क्र. २ च्या दिनांक ११ डिसेंबर, २०२० च्या पत्रान्वये संस्थेत कार्यरत असलेल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या समन्वयकांकडून सदरचे उपक्रम राबविण्याबाबत सर्व संस्थांना सूचित करण्यांत यावे.

त्याचप्रमाणे सदर उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यासाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थां यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी आपल्या कार्यालयात एका समन्वयकाची नियुक्ती करावी व त्यांचे मार्फत संस्था स्तरावरील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या समन्वयकांची माहिती आपल्या स्तरावर संकलित करुन ती खालील तक्त्यामध्ये भरुन careerkatta365@gmail.com या-मेल आयडीवर दिनांक १६-२-२०२१ पूर्वी पाठविण्याची कार्यवाही करावी. तसेच त्याची प्रत desk19@dtemaharashtra.gov.in या-मेल आयडीवर सादर करावी.

| विभागीय कार्यालयाचे नांव : | | |
|---|---|---|
| समन्वयकाचे नांव | मोबाईल क्रमांक | ई-मेल आयडी |
| | | |

| महाविद्यालयाचे नांव : | | | | |
|---|---|---|---|---|
| उपक्रम | समन्वयकाचे नांव | मोबाईल क्रमांक | व्हॉट्स अप क्रमांक | ई-मेल आयडी |
| IAS आपल्या भेटीला | | | | |
| उद्योजक आपल्या भेटीला | | | | |

सदर उपक्रमाची संकल्पना, उद्दिष्ट्ये, कार्यपध्दती, नोंदणी, व्यवस्थापकीय रचना इत्यादीबाबतची तपशीलवार माहिती सोबत जोडली आहे. सदरच्या माहितीचे अवलोकन करावे. त्याचप्रमाणे सदरच्या उपक्रमांची माहिती संस्थेच्या नोटीस बोर्ड व व्हॉटस्अप मेसेजच्या माध्यमातून अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्याबाबतही संस्थांना कळविण्यांत यावे. संस्थांमधील समन्वयकांना विद्यार्थ्यांची नोंदणी करताना किंवा प्रत्यक्ष योजना राबविण्याबाबत काही शंका असल्यास अथवा अधिक माहितीसाठी 7507652555 या क्रमांकावर संपर्क साधावा.

**सोबत :** उपक्रमाचे तपशीलवार सादरीकरण (नोंदणी करीता आवश्यक असणाऱ्या लिंकसह)

(प्रमोद नाईक)
सहसंचालक, तंत्र शिक्षण,
म.रा. मुंबई

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,

ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन/ २०२०/३५५ दिनांक : 11 DEC 2020

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, शासन अनुदानीत,
विनाअनुदानीत तांत्रिक व्यावसायिक
पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय : प्रत्येक तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करणे आणि समन्वयक नियुक्त करणे

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या प्रशासकीय सेवापूर्व परीक्षेमध्ये महाराष्ट्रातील मुलांचे प्रमाण वाढावे यासाठी महाराष्ट्र शासन संपूर्ण राज्यात सर्वतोपरी प्रयत्न करीत असून पूर्ण राज्यात अशी ०६ भारतीय प्रशासकीय सेवापूर्व परीक्षा प्रशिक्षण केंद्र शासनाने सुरू केलेली आहेत. यात संबंधित विषयाच्या तज्ञांकडून प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येते. सदर प्रशिक्षण केंद्रामधून दरवर्षी सुमारे ५४० मुलांना विनामुल्य प्रशिक्षण देण्यात येते, शिवाय त्यांना मासिक खर्चासाठी दरमहा शिष्यवृत्तीही दिली जाते. मागील काही वर्षातील अनुभव पाहता सदर केंद्रामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी परीक्षा देणा-या मुलांची संख्या वाढली आहे, परंतू किमान गुणही अनेक मुले मिळवू शकत नाही असे दिसून येते. यासंदर्भात मुलांना उचित मार्गदर्शन मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

महाराष्ट्रात असणा-या भारतीय प्रशासकीय सेवापूर्व केंद्राची माहिती विद्यार्थ्यांना देणे, केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या परीक्षांची माहिती विद्यार्थ्यांना देणे, सदर परीक्षांसाठी त्यांना प्रोत्साहित करणे, जास्तीत जासत मुलांसाठी फॉर्म भरला जाईल यासाठी पाठपुरावा करणे, भारतीय सेवा परीक्षेची तयारी करण्यासाठी योग्य मार्गदर्शन करणे, शासनाद्वारे स्थापन केलेल्या परीक्षा केंद्रांमध्ये प्रवेश परीक्षेसाठी मार्गदर्शन करणे, इ.सर्व कामे करण्यासाठी नव्याने सेवेत आलेल्या व योग्य मार्गदर्शन करु शकणा-या सहाय्यक प्राध्यापकाची समन्वयक म्हणून नेमणूक करावी. जेणेकरुन त्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना अनेक वर्ष मिळू शकेल. नेमणूक आदेशाची प्रत सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय तसेच संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव यांना देण्यात यावी.

सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये यांनी त्यांच्या विभागातील संस्थांकडून उपरोक्त सूचनांची अंमलबजावणी होण्याबाबत पाठपुरावा करावा व संस्थेमध्ये समन्वयक नियुक्त करण्यात आले आहेत याबाबतची माहिती संचालनालयास सादर करावी.

सदर सूचना विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी असून केंद्रीय लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेमार्फत घेण्यात येणा-या परीक्षांमध्ये महाराष्ट्रातील अधिकाधिक विद्यार्थी यशस्वी व्हावेत या उद्देशाने देण्यात येत आहेत. सदर समन्वय पदासाठी कोणतेही मानधन अथवा विशेष वेतन लागू होणार नाही.

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

१. मा.स्वीय सहाय्यक ,मंत्रीमहोदय,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई ३२
२. मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई ३२

प्रत : माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी

१. मा.कुलसचिव,सर्व अकृषि विद्यापीठे- त्यांना विनंती करण्यात येते की, केंद्रीय लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेमार्फत घेण्यात स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी योग्य त्या सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना देण्यात याव्यात.
२. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती, नागपूर- त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर संस्थांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने

# करिअर कट्टा



**मा. उदयजी सामंत**

**कॅबिनेट मंत्री –**

**महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

# संकल्पना

**मा. उदयजी सामंत कॅबिनेट मंत्री, महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग** यांच्या कारकिर्दीमध्ये महाराष्ट्र राज्याचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग कात टाकत आहे. ते आतापर्यंत असणाऱ्या सर्व शिक्षण मंत्री यांच्यापैकी पहिले असे शिक्षण मंत्री आहेत की, **ज्यांनी विद्यापीठाच्या प्रत्यक्ष भेटीवर भर दिलेला आहे, विद्यार्थी केंद्रित धोरण राबवत असताना त्यांचे प्रश्न समजून घेणे, प्रशासन लोकांच्या पर्यंत घेऊन जाणे आणि प्रश्नांचा निपटारा करण्याचा आवाका हे त्यांच्या कामाचे एक प्रमुख वैशिष्ट्य** म्हणावे लागेल अशा एका दूरदृष्टी असणाऱ्या मंत्रीमहोदयांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असणारा विभाग राज्यातील दरवर्षी लाखोच्या संख्येने पदवीधर होऊन बाहेर पडणाऱ्या **युवकांना कौशल्याभिमुख व उद्योजकीय ज्ञानाने परिपूर्ण असे अभ्यासक्रम देण्यासाठी कार्यशील** राहील, असे वाटते.

COVID- 19 ही जगावर आलेली एक आपत्ती जरी असली तरी भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये पर्यायाने महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेमध्ये एक मोठा सकारात्मक बदल झाला तो म्हणजे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षण व्यवस्था आणि प्रशासन हे तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणामध्ये करत ऑनलाइन शिक्षण-प्रशिक्षणाचा मार्ग अवलंबत आहेत, याच बाबीचा विचार करताना महाराष्ट्रातील उच्च शिक्षण विभागामध्ये शिकणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांसाठी एक अभिनव कल्पना राबवण्याचा मानस आहे.

- **IAS आपल्या भेटीला**
- **उद्योजक आपल्या भेटीला**

# IAS आपल्या भेटीला

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग आणि भारतीय प्रशासकीय सेवेच्या वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुणे, दिल्ली याठिकाणी वेगवेगळ्या सुविधा व मान्यवरांचे मार्गदर्शन उपलब्ध असल्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये ग्रामीण भागातून युवक शहरी भागामध्ये येतो. तो थांबवणे त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेसाठी करावा लागणारा खर्च सर्वसामान्यांच्या आवाक्यात यावा, यासाठी IAS आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत दिल्ली, मुंबई अथवा संपूर्ण भारतामध्ये कार्यरत असणारे प्रशासकीय अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन दररोज एक याप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देता येईल.

प्रत्यक्ष कार्यरत असणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचे वेगवेगळे अनुभव लोकांना प्रेरणा व प्रोत्साहन तर देतीलच पण त्याचबरोबर युवकांचा प्रशासकीय सेवेमध्ये येण्याचा दृष्टिकोन बदलण्यामध्ये देखील मदत होईल.

# उद्योजक आपल्या भेटीला

उद्योजकीय कौशल्य वाढीसाठी - उद्योजक आपल्या भेटीला हा उपक्रम महाविद्यालयीन युवक ज्यांना स्वतःचा उद्योग व्यवसाय सुरू करावयाचा आहे, त्यांचे उद्योजकीय कौशल्य वाढीस लागण्यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर चालू असणाऱ्या वेगवेगळ्या संकल्पनांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, या दृष्टिकोनातून "उद्योजक आपल्या भेटीला" हा उपक्रम राज्यभरामध्ये राबविण्यात येऊ शकतो.

महाविद्यालयांमध्ये सध्या अस्तित्वात असणाऱ्या 'उद्योजक विकास विभाग' त्याच्याशी संलग्न करून हा उपक्रम राबवता येणे सहज शक्य आहे. उद्योजकीय कौशल्य विकास उपक्रमांतर्गत वेगवेगळ्या बँकांचे प्रतिनिधी, वेगवेगळ्या प्रशासकीय विभागाचे प्रतिनिधी, वेगवेगळे तज्ञ यांअंतर्गत मार्गदर्शन करतील. मातृभाषेमध्ये उद्योजकीय कौशल्य विकासाचे उपक्रम राबवत असताना सर्वसाधारण कौशल्य विकास कार्यक्रमदेखील महाविद्यालय स्तरावर प्रत्यक्ष शक्य आहे.

# उपक्रमाची वैशिष्ट्ये

- अभूतपूर्व असा हा उपक्रम
- वर्षाचे 365 दिवस हा उपक्रम राबवला जाईल.
- दररोजचा खर्च प्रती विद्यार्थी केवळ एक रुपये
- प्रति महाविद्यालय सहभागी विद्यार्थ्यांची संख्या – 100
- राज्यात उपलब्ध असणाऱ्या किमान साधनांचा उपयोग करून हा उपक्रम राबवणे शक्य आहे.
- कुटुंबासाठी प्रति विद्यार्थी येणारा वार्षिक खर्च हा 365 रुपये इतका असल्यामुळे त्याला तो सहज शक्य आहे.
- सातत्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून त्या विषयाची आवड निर्माण करणे, त्यासाठी आवश्यक मानसिकता तयार करणे हे सहज शक्य आहे.
- शिक्षण विभागाचे मंत्री महोदय दर महिन्याला राज्यातल्या लाखो विद्यार्थ्यांना संबोधित करू शकतील.

# उपक्रमाची कार्यपद्धती

- **उच्च व तंत्रशिक्षण विभागाची जबाबदारी –**

  सदर उपक्रम प्रत्येक विद्यार्थ्यांच्यापर्यंत पोहोचावा, यासाठी विद्यापीठ प्रशासनाबरोबरच सहायक शिक्षण संचालकांच्या मदतीने महाविद्यालयापर्यंत उपक्रमाची माहिती पोहचवणे. सदर उपक्रम अपेक्षित परिणाम देत आहे की नाही, यासाठी वेळोवेळी अहवाल मागवुन घेणे व गुणवत्ता वाढीसाठी मार्गदर्शन करणे .

- **महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राची जबाबदारी-**

  आवश्यक असणारी सर्व तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देणे, आवश्यक असणारे सर्व व्याख्याते, मार्गदर्शक उपलब्ध करून देणे. विद्यार्थ्यांच्यापर्यंत माहिती पोहचण्यासाठी नियमित उपक्रमाची दिनदर्शिका उपलब्ध करून देणे, उपक्रम नियमितपणे व सुरळीत सुरू राहण्यासाठी आवश्यक साधनसामग्री उभी करणे.

- **विद्यापीठस्तरीय जबाबदारी –**

  संलग्न महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांच्या पर्यंत हा उपक्रम पोहोचवण्यासाठी विद्यापीठ प्रकल्प संचालकांच्या माध्यमातून माहिती पोहोचवणे.

- **महाविद्यालयांची जबाबदारी-**

  महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांच्यापर्यंत हा उपक्रम पोहोचवण्यासाठी प्रकल्प संचालकांच्या माध्यमातून माहिती पोहोचवणे.

# उपक्रमाची व्यवस्थापकीय रचना

- महाराष्ट्र शासन शिक्षण संचालक
- महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचा प्रकल्प समन्वयक
- विद्यापीठ स्तरावरील समन्वयक
- महाविद्यालयीन स्तरावरील समन्वयक

# उपक्रमाची नोंदणी प्रक्रिया

Google Form

https://forms.gle/gPZ9hChRLWTeTvB78

⬇

Payment Link

https://gpay.app.goo.gl/pay-rGPYCYuWeDZ

⬇

Confirmation

⬇

Workshop Participation

⬇

Certification

# धन्यवाद